# जर मी माझ्या डॉक्टरांना हे सांगू शकलो असतो...

ओंकार शिंदे

लहान होतो तेव्हापासून
जवळपास ६/७ वर्षांचा होतो
तेव्हापासूनचं आठवतंय
ताप आला, सर्दी झाली
कसतरी होतंय
काहीही झालं तरी मी
माझ्या डॉक्टरकडे पळतो
डॉक्टरचं लग्न, त्यांच्या घरातले कार्यक्रम
माझा वाढदिवस, माझ्या घरातले कार्यक्रम
माझे फॅमिली डॉक्टर माझे फॅमिली झाले आहेत
माझ्या आजारपणापासून,
माझं शिक्षण
माझं करियर
याबद्दलच्या सर्व निर्णयांमध्ये डॉक्टरांच मत नेहमीच महत्वाच असतं

मी मोठा होत असताना मला माझ्या लैंगिकतेची ओळख होत होती
काही गोष्टी समजत होत्या स्वतःबद्दल
स्वतःबद्दल कुतूहल निर्माण करणाऱ्या
पण तितक्याच अस्वस्थ करणाऱ्या
हा सर्व काळ खूप गोंधळाचा होता माझ्यासाठी
अजूनही आहे
डॉक्टरकडे गेल्यावर वाटायचं
सांगून टाकू का यांना सगळं
सगळे म्हणतात तसं
आजार तर नसेल ना हा ?

पण भीती वाटायची, अजूनही वाटते.

ह्या माणसाचा आपल्याला इतका आधार वाटतो

मग हि गोष्ट का नाही सांगू शकत मी त्यांना ?

माझ्या कुटुंबाचा भाग आहे हा माणूस

माझ्या घरातले सर्वजण ओळखतात यांना

माझ्या आयुष्यातील बऱ्याच महत्वाच्या गोष्टी यांना माहित आहेत

मग माझ्या आयुष्यातली इतकी महत्वाची गोष्ट मी का सांगू शकत नसेल?

भीती वाटते

कशाची?

मी यांना सगळं सांगितलं, आणि त्यांनी घरातल्या सगळ्यांना सांगितलं तर ?

काय सांगणार मी सगळ्यांना ?

कसं समजावणार मी सगळ्यांना?

डॉक्टरांना पण हा आजार तर वाटत नसेल ना?

डॉक्टरांच्या आणि माझ्या नात्यात काही बदल होईल का ?

जर त्यांनी मला तपासणं आणि औषधं देणं बंद केलं तर ?

हि व्यक्ती फक्त डॉक्टर नाही माझ्यासाठी

छोटं काही झालं तरी मी पळत जातो त्यांच्याकडं

कुठेही असलो तरी त्यांना फोन करून विचारतो

कोणती औषधं घेवू?

मी जर त्यांना माझ्या लैंगिकतेबद्दल सांगितल आणि त्यांचा माझ्यासोबतच्या वागण्यात बदल झाला तर?

भीती वाटते या सगळ्याची

भीती वाटते

किती बरं आणि सोप्प झालं असतं ना माझ्यासाठी आणि
माझ्यासारख्या इतरांसाठी
जर आमच्या फॅमिली डॉक्टरांनी सुरुवातीपासूनच आमच्यासोबत
याबद्दल चर्चा केली असती
त्यांनी आम्हाला याबद्दल स्वतःहून सांगितलं असतं
किंवा त्यांनी असं सुरक्षित आणि सहज वातावरण तयार केलं असतं,
असा विश्वास निर्माण केला असता, ज्यामुळे मला माझं मन मोकळं
करता आल असतं त्यांच्यासमोर

आता तुम्ही मला विचाराल की,
या सगळ्याची जबाबदारी माझ्या डॉक्टरांनी का घ्यायची
समाजातील प्रत्येकाची आहे हि जबाबदारी
मान्य आहे मला हे
मान्य आहे
मोठ्या प्रमाणात असं झालं आहे आणि असं होतंही आहे
जेव्हा आम्ही आमच्या लैंगिकतेबद्दल जवळच्या माणसाला सांगतो
तेव्हा ती माणसं आजार समजतात याला
डॉक्टर पण या गोष्टीला सहमत झाले कि संपतं आमच्यासाठी सगळं
अजूनही याला आजार समजतात बरीच लोकं

जर मला माझ्या डॉक्टरांनी आधार दिला असता
माझ्या मनात विश्वास निर्माण केला असता
ज्यामुळे मी त्यांना हे सांगू शकलो असतो
त्यांनी माझ्या घरच्यांना आणि जवळच्या माणसांना समजवण्यासाठी
माझी मदत केली असती
तर किती बरं झालं असतं
मला होणारा त्रास
माझी घुसमट
माझ्या मनातला गोंधळ
सगळं कमी झालं असतं
जर मी माझ्या डॉक्टरांना हे सांगू शकलो असतो....